# महाराष्ट्र राज्यातील सर्वंकष धोरणानुसार सन २०२५-२६ करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामधून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम बाबत

## *"सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) व प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत" उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना*

**सन २०२५-२६ करिता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून त्या त्या संस्थानुसार घेण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेच्या लाभासाठी खालील सूचना देण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये आवश्यक शैक्षणिक पात्रता, संबंधित आवश्यक कागदपत्रे तसेच प्रशिक्षणातील सोयी सुविधा आणि सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) साठी अर्ज करतांना घ्यावयाची काळजी ई. माहिती देण्यात आली आहे.**

### अ) उमेदवारांनी कोणत्याही योजनेच्या लाभासाठी सादर करावयाच्या अर्जाबाबतच्या सूचना :

१. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी अर्ज भरण्याच्या सूचना पूर्ण वाचून अर्ज सादर करावा. Application form बाबतच्या सर्व सूचना पूर्ण न वाचता अर्ज सादर केला आणि त्यात काही अडचणी/त्रुटी उद्भवल्यास उमेदवारास पुन्हा अर्ज सादर करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. एका वेळेस उमेदवार एकाच योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करू शकतो. उमेदवारास एकापेक्षा अधिक योजनेकरिता अर्ज करावयाच्या असल्यास Registration अंती उमेदवारास प्राप्त झालेल्या Login ID व Password चा वापर करून. Dashboard पानावरील Apply for new scheme या tab वर क्लिक करून इतर योजनांकरिता अर्ज भरता येईल. तथापि, याकरिता उमेदवाराने योजनानिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय व अर्जात नमूद केल्यानुसार इतर पात्रता व अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

३. सदर प्रशिक्षणासाठी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास/रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे अनिवार्य आहे.

४. बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय व आर्टी संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा अर्ज करते वेळेस उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate) असणे अनिवार्य आहे.

५. टीआरटीआय करिता ऑनलाईन अर्ज करताना अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकडे वैधता प्रमाणपत्र (Caste Validity) असणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्राकरिता अर्ज केला आहे परंतु त्यांना अद्याप वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही, ते अर्जाच्या तपशिलाचा वापर करून अर्ज सादर करू शकतात. तथापि अशा उमेदवाराची संबंधित योजनेकरिता लाभार्थी म्हणून निवड झाल्यास मूळ कागदपत्रे पडताळणी (Document Verification) च्या वेळी त्या उमेदवाराने वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

६. बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय व आर्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षणार्थी व त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/- (अक्षरात रक्कम रु. आठ लाख फक्त) पर्यंत असणे बंधनकारक आहे. उमेदवारांचे उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त असल्यास उमेदवारास सदर योजनेचा लाभ देता येणार नाही. तसेच याबाबत तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

७. सारथी मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराकडे उत्पन्न दाखला (मागील तीन वर्षाचा तहसीलदार यांच्या सहीने निर्गमित केलेला) किंवा नॉन क्रीमिलेयर दाखला असणे बंधनकारक आहे.

८. महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराकडे नॉन क्रीमिलेयर दाखला असणे बंधनकारक आहे.

९. दिव्यांग असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराकडे दिव्यांगत्वाचा दाखला असणे बंधनकारक आहे.

१०. अनाथ असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराकडे अनाथ असलेचा उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला दाखला असणे बंधनकारक आहे.

११. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येणार नाही. अशाप्रकारची खोटी माहिती सादर केल्यास किंवा माहिती लपविल्यास व तसे या कार्यालयास निदर्शनास आल्यास चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याबद्दल उमेदवाराचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल व उमेदवारावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांना पुढे भविष्यात संस्थेच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. उमेदवारांनी Online Application Form भरल्यानंतर सदर Form download करण्यासाठी ज्या दिवसापर्यंत मुदत दिली आहे त्या दिवसापर्यंतच Application Form प्रिंट करून घ्यावा त्यानंतर उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत कार्यालयाकडून Application Form मिळू शकणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन परीक्षेसाठी जे जिल्हे निवडले असतील व प्रथम प्राधान्य तत्वानुसार जे जिल्हे व परीक्षा केंद्र उमेदवारास प्राप्त झाले असेल तिथेच त्यांना परीक्षेसाठी उपस्थित राहावे लागेल. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविल्या व्यतिरिक्त कोणतेही परीक्षा केंद्र/जिल्हा/Exam city रद्द करण्याचा आणि/किंवा इतर काही केंद्रे जोडण्याचा अधिकार तसेच अपरिहार्य परिस्थितीत उमेदवाराला उपलब्ध क्षमता व रिक्त जागा नुसार कोणतेही परीक्षा केंद्र वाटप करण्याचा अधिकार बार्टी, पुणे यांनी राखून ठेवला आहे.

१५. फक्त संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाच्या सामायिक चाळणी परीक्षेकरिता दिल्ली हे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उर्वरित सर्व ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्र येथील नमूद केंद्रावर घेण्यात येईल. ज्या उमेदवारांना एका पेक्षा जास्त प्रशिक्षणासाठी अर्ज करावयाचा आहे अशा उमेदवारांनी याबाबत स्वत:च्या जबाबदारीने परीक्षा केंद्र निवडावीत. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा केंद्र बदलून देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१६. अर्ज भरतांना त्याचा User ID व मिळालेला password व्यवस्थित सांभाळून ठेवणे. उमेदवाराचा Generate झालेला User ID व password पुन्हा उपलब्ध करून दिला जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

१७. उमेदवारांनी Online Application Form काळजीपूर्वक भरावा, त्यामध्ये स्वत:चा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक काळजीपूर्वक भरावा.

१८. उमेदवाराने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१९. उमेदवाराने CET परीक्षेबाबतचे परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card/ Hall Ticket) तसेच परीक्षेबाबत असलेल्या सूचनांची माहिती संबंधित संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच download करावे.

२०. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाच्या सामायिक चाळणी परीक्षाबाबतचे (CET) वेळापत्रक बार्टी, पुणे च्या http://barti.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल उमेदवारांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य आहे.

२१. एका पेक्षा जास्त योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केल्यास प्रसिद्ध वेळापत्रकानुसार ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर विहित वेळेत उपस्थित राहण्याची सर्व जबाबदारी उमेदवारांची राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे परीक्षा केंद्र व परीक्षेच्या निर्धारित वेळेत बदल करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

२२. सदर सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (CET) उमेदवारांची कोणतीही मूळ कागदपत्रे न तपासता सदर चाळणी परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि सामायिक चाळणी परीक्षेतून निवड झाल्यानंतर मूळ कागदपत्रे तपासूनच निवड अंतिम करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. सामायिक चाळणी परीक्षा उत्तीर्ण होऊन निवड झाली तरी निवड अंतिम ग्राह्य धरण्यात येणार नाही, उमेदवाराने कागदपत्रे तपासणी दरम्यान नमूद केलेली विहित मूळ कागदपत्रे सादर न केल्यास निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२३. निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार सामायिक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात येणार असल्याने सर्व योजनांची परीक्षा संपल्यावरच सर्व संबंधित योजनांच्या सामायिक प्रवेश परीक्षांचा (CET)" निकाल किमान ०७ ते १० दिवसांनी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत केवळ संस्थेच्या संकेतस्थळांवरच सूचना प्रसिद्ध केल्या जातील वैयक्तिक स्वरूपात कोणत्याही उमेदवारांना कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवारांनी याबाबत कार्यालयात दूरध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा करू नये तसेच कार्यालयातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधू नये.

२४. सदर योजनेची सामायिक चाळणी परीक्षा (CET) उत्तीर्ण करून, मूळ कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर उमेदवाराने निवड केलेल्या संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेशित झाल्यानंतर नियमानुसार शासनाने निश्चित केलेल्या कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान उमेदवारास इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडता येणार नाही.

२५. सामायिक चाळणी परीक्षेतून निवड झाल्यावर उमेदवारांनी मूळ कागदपत्रे संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचनेतील निर्धारित कालावधीत तपासून घेणे अनिवार्य आहे. दिलेल्या निर्धारित कालावधीत जर उमेदवार आपले कागदपत्रे तपासून घेतली नाहीत किंवा संबधीत संस्थेच्या कार्यालयाशी याबाबत कोणताही संपर्क साधला नाहीत तर उमेदवाराचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२६. प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराने धुम्रपान करणे, अंमली पदार्थाचे सेवन करणे, मद्यपान करणे, उद्धट वर्तन असे गैरप्रकार केल्यास/आढळल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येऊन कायदेशीर/दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२७. अनुसूचित जमातीतील आदिम जमातीच्या (PVTG) उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

२८. नियमानुसार महिला, दिव्यांग व अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर महिला, दिव्यांग व अनाथ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा उमेदवारांच्या गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

२९. सदर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणास उमेदवारांची प्रत्येक महिन्यासाठी ७५% उपस्थिती आवश्यक (अनिवार्य) आहे.

३०. प्रवेश परीक्षा, प्रवेश पत्र, गुणवत्ता यादी / प्रतीक्षा यादी, कागदपत्रे तपासणी/पडताळणी, तसेच इतर प्रक्रिया बाबतची सर्व अद्यावत माहिती http://barti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल. याबाबतची कोणतीही माहिती कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक स्वरुपात/लेखी पत्रव्यवहार व्दारे कळविण्यात येणार नाही.

३१. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाबाबत शासनाने निश्चित केलेल्या कालावधी नुसार सामान्य अध्ययन या विषयाची पूर्व + मुख्य तसेच मुलाखत व वैकल्पिक विषय तयारी, व्याख्यात्यांचे मानधन, स्टडी मटेरीअल, नोटस् (वाचन साहित्य) टेस्ट सिरीज, आवश्यक वतर्मानपत्र, मासिके, पुस्तके स्टेशनरी इ. पुरवण्याची जबाबदारी संबंधित नामनिर्देशित प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेची राहील.

३२. सामायिक चाळणी परीक्षा तसेच निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बार्टी, टीआरटीआय,सारथी, महाज्योती व आर्टी या संस्था त्यांच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम त्या त्या संस्थेच्या नियम व निकषानुसार राबवतील तसेच याबाबत सर्व नियम उमेदवारांना बंधनकारक असतील.

३३. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान कुठेही शासकीय/ निमशासकीय/खाजगी नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत काही तक्रार प्राप्त झाल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**ब) कोणत्याही योजनेच्या लाभासाठी उमेदवारांकडे आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच इतर संबधित कागदपत्रांची यादी :**

१. जात/जमातीचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
२. जमातीचे वैधता मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
३. दहावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
४. बारावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
५. पदवी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
६. रहिवासी दाखला मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
७. आधारकार्ड मूळ छायांकित स्कॅन प्रत
८. आधारकार्ड लिंक असलेले मूळ बँक तपशील – पास बुक स्कॅन प्रत
९. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत
१०. दिव्यांग असल्यास, सिविल सर्जन यांनी निर्गमित केलेला दिव्यांगत्वाचा दाखला स्कॅन प्रत
११. अनाथ असल्यास, उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला स्कॅन प्रत.
१२. नॉन क्रीमिलेयर दाखला मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत (सारथी व महाज्योती करिता)

## सर्वंकष धोरणाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना कालावधी | विद्यावेतन (प्रति माह), अनुषंगिक लाभ (पुस्तक संच रक्कम तसेच इतर खर्च-एकवेळ) |
|---|---|---|---|
| १ | दिल्ली येथील कोचिंग संस्थामध्ये यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु. १३००० प्रती माह प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १८००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • प्रवास खर्च -रु. १००००/- (एकवेळ) |
| २ | महाराष्ट्र येथे यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु. १३०००*११ महिने प्रती विद्यार्थी/ माह<br>• अनुषंगिक लाभ - रु. १८००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ३ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२०००/- प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ४ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग- अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन — रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ- रु.१२००० (एकवेळ) |
| ५ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग-महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन — रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ- रु.१२०००(एकवेळ) |
| ६ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग -दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ७ | बँक (IBPS), रेल्वे, एलआयसी, नाबार्ड इत्यादी तत्सम स्पर्धा परीक्षा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.६००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १००००/- प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ८ | पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ९ | कर्मचारी निवड आयोग (SSC) — वर्ग -३ परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी |

उमेदवारास आवेदन पत्र भरतांना (Application Form) जर कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या हेल्पलाईन क्रमांक व ईमेल आय. डी. वरच संपर्क साधावा. तसेच उपरोक्त सर्व काळजीपूर्वक सूचना वाचून व्यवस्थितरीत्या खात्री करूनच सदर योजनेचा अर्ज भरावा.

## सर्व उमेदवारांना परीक्षेसाठी All The Best!

## For Technical Support:-

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा दूरध्वनी |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) | ०२२ ६५९३४००१ |
| २ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टीआरटीआय) | ०२२ ६५९३४००३ |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (सारथी) | ०२२ ६५९३४००५ |
| ४ | महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) | ०२२ ६५९३४००७ |
| ५ | आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) | ०२२ ६५९३४००९ |
| | Email ID | cethelpdesk2025@gmail.com |

## Non technical Support

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा दूरध्वनी | संकेतस्थळ |
|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) | ०२० २६३३३३३०<br>०२० २६३३३३३९<br>०२०२६३४३६०० | bartihelpdesk@gmail.com |
| २ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (टीआरटीआय) | ०२० २६३३०८५४ | helpdesk.cpetptrti@gmail.com |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (सारथी) | ०२० २५५९२५२०<br>०२० २५५९२५५० | helpdesk.cecsarthi@gmail.com |
| ४ | महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) | ०७१ -२२८७०१२०/१२१ | mahajyotingp@gmail.com |
| ५ | आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) | ०२२ ४४५१५८५४/<br>२५५००१९४/२५५००१९५ | arti.cet25@gmail.com |